**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. जावीद देशमुख
प्लॉट नं.१७, डॉ.अन्सारी चौक,
शास्त्रीनगर, सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता,**
श्री छत्रपती शिवाजी सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी,**
श्री छत्रपती शिवाजी सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३२/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८/०८/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२/९/२००८, १७/०९/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/०९/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१)सन २००५ ते २००८ या वर्षात एड्स रोगावरील उपचाराकरिता शासनाकडून प्राप्त झालेली रक्कम व केलेल्या खर्चाचा रोग्याच्या नाव व पत्यासह तपशिल<br>२) वरील कालावधीत एड्स रोगासंबधी प्रचार व प्रसार करण्यासाठी प्राप्त झालेली रक्कम व झालेल्या खर्चाचा तपशील<br>३) आर्थिक दुर्बल घटकातील रुग्णांना आहार देण्याच्या योजनेतील ठेकेदाराचे नाव, पत्ता व ठेक्याचा कालावधी इ. तपशील | |

## विवेचन

[illegible] माहिती आयोगाने [illegible] केलेल्या [illegible]०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. जावीद देशमुख हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्याच्या मागणीप्रमाणे सर्व माहिती संकलित करुन दिनांक १७/०९/२००८ रोजी तयार ठेवण्यात आली होती व आवश्यक शुल्काचा भरणा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि अपीलकर्ता माहिती घेऊन गेले नाहीत. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता यांनी सुध्दा अपीलकर्त्यास दोन वेळा स्मरणपत्र पाठवून माहिती घेऊन जाण्यास कळविले होते. तरीदेखील अपीलकर्त्यांनी माहिती घेतली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरेश देवकर व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक अधिष्ठाता, सोलापूर डॉ.ए.आर .धाकतोडे यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे ते लक्षात घेता अपीलकर्त्यांने नियमांप्रमाणे शुल्क भरुन आवश्यकतर माहिती घ्यावी.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
माहितीचा अधिकार अधियिम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री विठ्ठल सर्व सेवा संघ
वेणुनगर, ता.पंढरपूर,
जि.सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
नाथ प्राईड, पहिला मजला. सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वेस,
उत्तर सदर बझार, सोलापूर

उत्तरवादी

**मूळ अर्जदार,**
श्री. प्रकाश शिवदास थिटे
प्लॉट ४७६५/१ गाताडे प्लॉट,
पंढरपूर. जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३४/सोलापूर+१३३५/सोलापूर१३३६/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७/०५/२००८ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७/०९/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री विठ्ठल सर्व सेवा संघाच्या संचालकांची यादी, त्यांच्या नातेवाईकांकडील ॲडव्हान्स थकित रक्कमा, कर्मचाऱ्यांची यादी व नियुक्ती आदेश इ. ४ मुद्दे | |

विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.४/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर तिन्ही अपिलांचा समावेश करण्यात आला होता. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा संस्थेस लागू नसल्याचे व्यवस्थापक, श्री विठ्ठल सेवा संघ वेणुनगर, ता.पंढरपूर श्री.टी.ए.खान

यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार अर्ज /अपील अपीलकर्त्यांच्या नावे करणे आवश्यक आहे, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) तिन्ही अपिले मान्य करण्यात येत आहेत.

२) सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे मूळ अर्जदार श्री. प्रकाश शिवदास थिटे यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. तसेच सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या दि. १७/०९/२००८ रोजीच्या निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही. सबब सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेले दि. १७/०९/२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधियिम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. आण्णासाहेब तानाजी मस्के
मु.पो.उंदरगाव, ता.माढा,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा चेअरमन सचिव,**
महात्मा फुले ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, बारलोणी,
ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३८/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/०९/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५/१०/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११/१२/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** महात्मा फुले ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, बारलोणीच्या १९९९ पासून २००८ पर्यंतच्या बांधकाम निधीच्या हिशेबाबाबतची माहिती | |

## विवेचन

नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. सबब सदरचे अपील हे दखलयोग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. आण्णासाहेब तानाजी मस्के
मु.पो.उंदरगाव, ता.माढा, जि.सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा चेअरमन सचिव,**
संत रोहिदास ग्रामीण बिगारी शेती पतसंस्था मर्यादित, बारलोणी,
ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३९/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/०९/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५/१०/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११/१२/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** संत रोहिदास ग्रामीण बिगारी शेती पतसंस्था मर्यादित, बारलोणीच्या सन १९९९ पासून २००८ पर्यंतच्या सर्व कर्जदार सभासदांची यादी, त्यांच्याकडून घेतलेला बांधकाम निधी, खर्चाच्या पावत्या, बांधकाम अंदाजपत्रक, सहकार खात्याच्या परवानगी इ. माहिती | |

## विवेचन

नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. सबब सदरचे अपील हे दखलयोग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. गोवर्धन लक्ष्मण साळुंखे
मु.पो.भोसे, ता.पंढरपूर,
जि.सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक निबंधक,**
सहकारी संस्था ता.पंढरपूर, जि.सोलापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सचिव,
श्री जानुबाईदेवी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्यादित,
भोसे, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४१/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०/१०/२००८ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९/११/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००५ ते २००८ या कालावधीतील संस्थेच्या संचालक मंडळाच्या मासिक बैठकांचे व वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कार्यक्रमपत्रिका व इतिवृत्त | |

<u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.४/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. गोवर्धन लक्ष्मण साळुंखे हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्याने मागितलेली माहिती आठ दिवसांच्या मुदतीत अपीलकर्त्यास देण्यात येईल', असे जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री जानुबाईदेवी विविध

कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्यादित, भोसे व अपिलीय प्राधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, पंढरपूर यांनी प्रपत्रात [illegible] केले होते. त्यानुसार दि.६/०४/२००९ रोजी नोंदणीकृत डाकेने अपीलकर्त्यास माहिती पाठविली असता अपीलकर्ता श्री. गोवर्धन लक्ष्मण साळुंखे यांनी माहिती स्वीकारली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा सचिव, यांनी दि.१३/०४/२००९ रोजीच्या पत्रान्वये पुराव्यासह आयोगास कळविले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु.महागांव, पो.बावी, ता.बार्शी,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,**
पुणे विभाग, पी.एम.टी. इमारत, जानकी हॉलच्या पाठीमागे,
स्वारगेट, पुणे-३७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,**
सोलापूर,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५४/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२/०९/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७/११/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.बी.डी.हावळे, समाजकल्याण निरीक्षक व श्री.उ.म.कांबळे, विशेष समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांनी याचिका क्र.१६४९/९८ मध्ये ज्या कागदपत्रांच्या आधारे उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे, सदर कागदपत्रांच्या सत्यप्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शिवशंकर विश्वनाथ घोलप यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन त्यांना आवश्यक असणारी माहिती ही अप्पर मुख्य सचिव, समाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई या कार्यालयाशी निगडित असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तथापि माहिती-मागणी अर्ज मात्र जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,

सोलापूर, यांच्याकडे केलेला आहे. तसेच मूळ माहिती - मागणी अर्जाव्यतिरिक्त प्रथम व आयोगाकडील अपिलामध्ये नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे. सदरची बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती वत्सला वसंत खांडेकर
मु.डोंबाळवाडी (कुरबावी),
ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय माळशिरस, माळशिरस

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी,**
डोंबाळवाडी (कुरबावी), ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/१०/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १/१२/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/११/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५/१२/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सर्व्हे नं.२३२/१ अ, जुना गट नं.१३३२ मधील अस्तित्वात असणाऱ्या विहिरीच्या व वहीवाटीच्या अनुषंगाने एकूण १० मुद्दे | |

<u>विवेचन</u>

अपीलकर्त्या श्रीमती वत्सला वसंत खांडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध माहिती जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, डोंबाळवाडी (कुरबावी), ता.माळशिरस यांनी दिलेली असल्याचे दिसून येते. अपीलकर्त्या श्रीमती खांडेकर यांची मूळ मागणी ही विहिरीचा हिस्सा त्यांच्या नावावर व्हावा, ही असून सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नामदेव केरु गायकवाड
केतुर नाका, जगताप वाडा,
मु.पो.व ता.करमाळा,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय करमाळा,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय करमाळा,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६५/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३/१२/२००८ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामपंचायत, कोर्टी अंतर्गत घरकुल मंजुरी व रेशन दुकानदारांची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. नामदेव केरु गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. सदर कागपत्रांची पूर्तता करण्याबाबत आयोगाच्या दि.२०/३/२००९ च्या पत्रान्वये त्यांना कळविण्यात आले होते तथापि त्यांनी अद्यापही सदर कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही. अपीलकर्ता श्री. नामदेव केरु गायकवाड

यांच्या अपिलासोबतच्या उपलब्ध कागदपत्रांवरुन त्यांना त्यांच्या मागणीनुसार जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करमाळा यांनी माहिती दिली असल्याचे दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शहाजी जगन्नाथ ठोसर
मु.पो.करंजे, ता.करमाळा,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती करमाळा, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,**
पंचायत समिती करमाळा,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६९/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/०८/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०/०९/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.७/११/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** करमाळा तालुक्यातील मौजे बीटरगाव(वांगी) व जिंती येथील जिल्हा परिषद शाळेतील १०८५ विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यासंदर्भातील माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.४/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. शहाजी जगन्नाथ ठोसर हे अनुपस्थित होते. अपीलकर्त्याच्या माहिती - मागणी अर्जानुसार मागितलेली माहिती ही स्पष्ट नसल्यामुळे त्यांना नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे याबाबतचा अर्थबोध होत नाही, तरी

देखील त्यांना उपलब्ध असणारी माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, यांचे प्रतिनिधी प्रभारी शिक्षण विस्तार अधिकारी, श्री.भा.रा.पांडव व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, करमाळा, जि.सोलापूर यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विनोद विष्णुपंत महाडिक
४५५२/०२, महाडिक बंगला,
जुना कराड नाका, पंढरपूर, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),**
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,**
भिमा सहकारी साखर कारखाना मर्यादित,
टाकळी सिंकदर, ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९९/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १/०९/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २/१२/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २/०१/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** भिमा साखर कारखाना मर्यादित., टाकळी सिकंदर च्या १९८५ ते सन २००५ पर्यंतच्या कालावधीच्या स्टाफ ॲडव्हान्स, स्टोअर खरेदी, स्थापत्य बांधकाम, पाईपलाईन, टिश्यु कल्चर स्किम, जनावरे छावणी इ. एकूण २० मुद्दयासंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.४/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीनुसार

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, भिमा सहकारी साखर कारखाना मर्यादित, टाकळी सिकंदर यांनी प्रपत्रात नमूद केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसांत आयोगास सादर करावा.

**पुणे.**
**दि :-** 31 MAR 2010

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. नरेंद्र गंगाधर टिकारे
८९७, भवानी पेठ, नव महाराष्ट्र मंडळाजवळ,पुणे-४११ ०४२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
विभागीय कार्यालय क्र.३, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
विभागीय कार्यालय क्र.३, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७२ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. नरेंद्र गंगाधर टिकारे
८९७, भवानी पेठ, नव महाराष्ट्र मंडळाजवळ,
पुणे-४११ ०४२

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
विभागीय कार्यालय क्र.३, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सुरेश जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
विभागीय कार्यालय क्र.३, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सतीश श्रीपाद भोसरेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.९.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.१०.२००९ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

परवाना संपलेला असताना चालू असलेल्या बांधकामाच्या अनुषंगाने नकाशा व इ. बाबीं-विषयीची माहिती आपण मागितली होती. आवश्यक प्रमाणात जागा न सोडता बांधकाम केले याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. नरेंद्र गंगाधर टिकारे यांनी केली.

सर्व संबंधित माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता क्र.३, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका श्री. सतीश श्रीपाद भोसरेकर यांनी नमूद केले.

कराराप्रमाणे बांधकाम केले नसल्याबद्दल आर्किटेक्ट व बिल्डर यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. या प्रशासकीय बाबीसह सर्व माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली. आधी दिलेला पूर्वीचा मान्य नकाशा चुकीचा असून अद्यावत असा दुरूस्त नकाशा देण्यात येत आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, विभागीय कार्यालय क्र.३, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका श्री सुरेश जगताप यांनी केले. सुरक्षिततेबाबतची काळजी न घेता बांधकाम चालू असल्याची अपीलकर्त्याची तक्रार असून सुरक्षिततेच्या संदर्भातील माहिती व बांधकाम-विषयक अटींच्या प्रती अपीलकर्त्यास निःशुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. २४.२.२०१० रोजी पूर्तता करण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, पुणे महानगरपालिका श्री. सुरेश जगताप यांनी दि. ८.३.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अमोल गजानन चंद
रा.लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
हवेली तहसील कार्यालय,
ता. हवेली, शुक्रवार पेठ, पुणे -२ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
हवेली तहसील कार्यालय,
ता. हवेली, शुक्रवार पेठ, पुणे -२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३६/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |
| **३.** | **उपस्थित** | |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, ता. हवेली, शुक्रवार पेठ, पुणे -२ | श्री.विजय पाटील |
| | **जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, ता. हवेली, शुक्रवार पेठ, पुणे -२ | श्री.जगदीश ह. निंबाळकर |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.१०.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.११.२००७ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जमीन खरेदीच्या संदर्भातील संबंधित व्यक्ती शेतकरी असल्याचा पुरावा वारंवार मागणी करुनही दिला जात नाही, व त्याबाबत दोषी असणाऱ्यांवर कारवाई करुन पीडित घटकाला न्याय दिला जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.अमोल गजानन चंद यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केले आहे.

अपीलकर्त्यास संबंधित प्रकरणातील सर्व कागदपत्रांच्या नकला पुरविण्यात आल्या आहेत. नसलेल्या कागदपत्रांची मागणी ते करीत असल्याचे व त्यांच्या तक्रारीवरील कार्यवाही ही प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्याचे वेळोवेळी त्यांना स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, ता.हवेली, शुक्रवार पेठ, पुणे-२ श्री.जगदीश ह. निंबाळकर यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य .

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
**दि.** 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सदानंद जगन्नाथ शेरे
मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपआयुक्त,
सामान्य प्रशासन, विधान भवन,
पुणे विभाग, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक संचालक,
नगरविकास प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५८/२००८/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.०२.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री.सदानंद जगन्नाथ शेरे<br>मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** उपआयुक्त,<br>सामान्य प्रशासन, विधान भवन,<br>पुणे विभाग, पुणे-१ श्री. प्रकाश स. पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक संचालक,<br>नगरविकास प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे-१ श्री.सुभाष गोसावी | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१३.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.१२.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जेजुरी नगरपरिषदेच्या हद्दीचा आपण मागितलेला नकाशा मिळाला, परंतु लगत असलेल्या वस्त्या आपल्या हद्दीतील नसल्याचे नगरपरिषदेचे म्हणणे आहे. शिवेच्या आत या वस्त्या असूनही मतदानाचा अधिकार मिळत नाही. नकाशात समाविष्ट असलेल्या गटांमध्येही पाणीपुरवठा केला जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सदानंद जगन्नाथ शेरे यांनी केली .

श्री.शेरे यांना विहित मुदतीत व योग्य माहिती देण्यात आली होती. जिल्हाधिकारी; पुणे, मुख्याधिकारी; जेजुरी नगरपरिषद व तालुका निरीक्षक; भूमी अभिलेख, सासवड अशा विविध विभागांकडे असलेल्या माहितीबाबत श्री.शेरे यांना कळविले. सन १८६८ मध्ये जेजुरी नगरपरिषद स्थापन झाली असून तेव्हापासूनच्या जन्म-मृत्यू नोंदी श्री.शेरे यांनी मागितल्या होत्या. अभिलेखांचे अवलोकन करण्याबाबतही त्यांना कळविले होते. मतदानाचा हक्क पाणीपुरवठा आदीबाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगरविकास प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे-१ श्री.सुभाष गोसावी व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, सामान्य प्रशासन, विधान भवन,पुणे विभाग, पुणे-१ श्री. प्रकाश स. पाटील यांनी नमूद केले. या अनुषंगाने अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त,सामान्य प्रशासन, विधान भवन,पुणे विभाग, पुणे-१ श्री. प्रकाश स. पाटील यांनी प्रथम अपिलातत दिलेला निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य.

**स्थळ : पुणे**
**दि.** 22 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नवनाथ काशिनाथ शितोळे
मु.पो.मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, श्री वाघेश्वर विद्याधाम,
मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री वाघेश्वर विद्याधाम,
मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नवनाथ काशिनाथ शितोळे
मु.पो.मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री वाघेश्वर विद्याधाम,
मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे श्री.ए.आर.वेताळ

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१९.१०.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३०.१०.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.११.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२४.२.२०१० रोजी घेण्यात आली.

श्री वाघेश्वर विद्याधाम, मांडवगण फराटा या शाळेतून घेतल्या जाणाऱ्या दाखला शुल्काबाबतची माहिती शाळेने व संस्थेने वेगवेगळी दिली. चुकीची माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री वाघेश्वर विद्याधाम, मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.नवनाथ काशिनाथ शितोळे यांनी केली.

शासकीय नियमानुसार तीन रूपये दाखला शुल्क घेतले जाते, असे आपण कळविले. बोर्डाच्या नियमाप्रमाणे १०० रूपये शुल्क घेतले जाते. तसे संस्थेच्या चिटणीसांनी कळविले. दिलेली माहिती योग्य असून संबंधित रकमेची पावती दिली जाते. हिशेब रोजकीर्द, इतर जमाखर्च दाखविण्यास संस्था तयार असल्याचे अपीलकर्त्यास वेळोवेळी सागितले आहे. विहित मुदतीत उत्तर व माहिती दिली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री वाघेश्वर विद्याधाम, मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे श्री.ए.आर.वेताळ यांनी केले.

अपीलकर्त्यास पाठविलेल्या पत्राच्या जावक बारनिशीतील नोंदीची प्रत आयोगास सादर करावी, असे मौखिक आदेश आयागाने सुनावणच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री वाघेश्वर विद्याधाम, मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे श्री.ए.आर.वेताळ

यानी अपीलकर्त्याची माहिती मिळाल्याची पोहोच असलेल्या स्वाक्षरीसह जावक बारनिशीतील नोंदीची प्रत आयोगास सादर केली. हे लक्षात घेता अपीलकर्त्याची तक्रार रास्त ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010